# पलूस नगरपरिषद पलूस जि.सांगली.

# ई- निविदा सूचना

दिनांक – १६/०५/२०२६

मा. मुख्याधिकारी, पलूस नगरपरिषद, पलूस जि.सांगली यांचे मार्फत यांचे मार्फत माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रकमेतून हाती घ्यावायच्या कामांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मधील मंजूर कामांच्या शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीनेच मागविणेत येत आहे.

**ई-निविदा प्रसिद्धीचा तपशील**

| | |
|---|---|
| ऑनलाईन निविदा विक्री व स्वीकृती दिनांक | दिनांक.१८/०५/२०२६ ते २५/०५/२०२६ रोजी ४.०० वाजेपर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याची दिनांक | दिनांक.२६/०५/२०२६ रोजी १२.०० वा शक्य झाल्यास |

**अटी व शर्ती –**

सदर कामाच्या निविदेसंदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी सुचना, शुध्दीपत्रके इत्यादीची माहिती http:/mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व पलूस नगरपरिषद बांधकाम विभाग येथे उपलब्ध होईल.

**SD/-XXX**
**मुख्याधिकारी**
**पलूस नगरपरिषद पलूस**

# ई- निविदा

मुख्याधिकारी, पलूस नगरपरिषद, पलूस, जिल्हा- सांगली हे अनुभवी मक्तेदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामाच्या ई-निविदा मागवित आहे. ई-निविदेचा कोरा नमुना http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.11/06/2025 रोजी 14.00 वाजलेपासून दि.18/06/2025 रोजी 16.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | बयाना रक्कम 1 % | फॉर्म फी. | काम करणेची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | माझी वसुंधरा अभियान 4.0 अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) अंतर्गत विविध कामे करणे. | 95,50,572/- | 95600/- | 2000/- | 12 महिने |

1. उपरोक्त सर्व कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून को-या निविदा संच http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर स्थळावरुन दि.18/05/2026 रोजी 14.00 वाजलेपासून चि.25/05/2026 रोजी 16.00 वाजेपर्यंत ऑनलाईन पहावयास मिळतील.
2. उपरोक्त तक्त्यातील कामाचे नावासमोर रकाना क्र.2 व क्र. 3 मध्ये नमुद रक्कम ऑनलाईन (online) पद्धतीने भरणेची आहे. सदर रक्कम http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन स्थळावरुन दि.18/05/2026 रोजी 14.00 वाजलेपासून चि.25/05/2026 रोजी 16.00 वाजेपर्यंत भरता येतील.
3. ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या लिफाफा क्र. 1 (तांत्रिक लिफाफा) मधील कागद पत्रांच्या हार्ड कॉपीजचा लिफाफा शक्य झाल्यास दि.26/05/2026 रोजी 12.00 वाजता मुख्याधिकारी पलूस नगरपरिषद, पलूस यांचे कार्यालयात उघडणेत येतील सर्वास कळावे.

# <u>सविस्तर निविदा सुचना</u>

पलूस नगरपरिषद पलूस

ई-निविदांतर्गत निविदा सुचना

1. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई- निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय आज्ञावलीत होईल, सदर निविदेसंदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी, सुचना, शुध्दीपत्रके इत्यादीची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
2. वरील कामांची निविदा प्रपत्रे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती इ. सदर संकेत स्थळावरुन दि.18/05/2026 रोजी 14.00 वाजलेपासून चि.25/05/2026 रोजी 16.00 वाजेपर्यंत अधिग्रहीत (Download) करता येतील.
3. वरील कामांच्या निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. दि.18/05/2026 रोजी 14.00 वाजलेपासून चि.25/05/2026 रोजी 16.00 वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर (Upload) करता येतील.
4. मक्तेदारांनी खालीलप्रमाणे दोन लिफाफा (Two Envelope) पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे.

**(अ) / पात्रता / तांत्रिक लिफाफा (लिफाफा क्र.१)**

1. निविदा फी भरल्याची पावती
2. EMD भरल्याची पावती .
3. PWD नोंदणी प्रमाणपत्र
4. PAN कार्ड
5. GST प्रमाणपत्र
6. मागील ३ वर्षांचे आयकर विवरणपत्र (CA प्रमाणित)
7. EPF प्रमाणपत्र
8. संस्थेची संपूर्ण माहिती (पत्ता, संपर्क क्रमांक)
9. सर्व मूळ कागदपत्रे व त्यांचे सत्यप्रत
10. नगरपरिषद सदस्याचा कोणताही स्वार्थ नाही याबाबत प्रतिज्ञापत्र
11. कंत्राटदार किमान वर्ग ४ किंवा त्यापेक्षा वरचा असावा
12. प्रकल्पासाठी तांत्रिक कर्मचाऱ्यांची माहिती
13. कामाच्या ठिकाणाचे Geo-tagged फोटोई.
14. ESIC प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.
15. मक्तेदाराने कामाकरीता लावलेल्या कामगाराचे भविष्य निर्वाह निधी (EPFO कडील खाते) असणे आवश्यक राहील.
16. निविदाधारकाने निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची भरल्यास महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2 दि.26/11/2018 रोजीच्या शासन परिपत्रकानुसार अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम भरणे बंधनकारक राहील.
17. सदर निविदेमध्ये सहभागी होणाऱ्या कंत्राटदाराने संबंधित कामांचा सविस्तर कृती आराखडा (Action Plan) तयार करून तो पलूस नगरपरिषदेस सादर करणे आवश्यक राहील. तसेच, सदर कृती आराखडा सादर केल्याची अधिकृत पोहोच/प्राप्ती दाखला (Acknowledgement) निविदेसोबत जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा, अशा निविदा अपात्र (Disqualified) समजण्यात येतील.

18. कोणत्याही शासकीय / निमशासकीय संस्थेने काम रद्द केलेचे (Terminate) केले नसल्याचे तसेच काळ्या यादीत (Black List) टाकले नसलेबाबतचे रु. 100/- च्या मुद्रांकावर (स्टँप पेपर) वरील नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र.
19. कोणत्याही बाबीसाठी काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत नगरपरिषदेचा निर्णय अंतिम राहील.
20. निविदा प्रपत्रातील अ, ब, क मधील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र 500/- रु. च्या मुद्रांकावर (स्टँप पेपर) सादर करणेचे आहे.

**टिप-वरील सर्व कागदपत्रे PDF Format मध्येच Upload करावीत.**

**<u>(ब) आर्थिक लिफाफा (लिफाफा क्र.२)</u>**

1. मक्तेदारांनी आपले दर विहित "BOQ" मध्ये योग्य त्या जागी भरुन सदरची "BOQ" लिफाफा क्र. २ मध्ये अपलोड करावी, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या निविदेचे दर इतर कोठेही नमूद करणेत येऊ नयेत.

**क) निविदा सादर करणे**

1. उपरोक्त प्रमाणे नमुद दोन लिफाफा पध्दतीने निविदा ऑनलाईन पध्दतीने अपलोड करुन सादर करावी लागेल. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ बंधनकारक राहील, मक्तेदारांनी विहीत वेळेपूर्वी त्यांची निविदा अपलोड करणेची दक्षता घ्यावी.
2. मक्तेदारांनी कामाचे नकाशे, निविदेतील अटी व शर्ती बाबनिहाय Specifications कामाचे स्थळ, मजूर व साहित्याची उपलब्धता या सर्व बाबीचा अभ्यास करुन निविदा सादर कराव्यात, कामासंबधी अधिक माहिती नगरपरिषद कार्यालयातील संबंधित विभागाकडे कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवसाखेरीज मिळू शकेल.
3. मक्तेदारांनी सादर केलेली निविदा व निविदेतील दर, लिफाफा क्र. २ उघडलेनंतर, १२० दिवसापर्यंत वैध राहतील.
4. मंजूर निविदा धारकाकडून बयाणा रक्कम अनामत म्हणून जमा करून घेवून सुरक्षा अनामत रक्कम देयकातून कपात केली जाईल.
5. मक्तेदाराने आपली निविदा सर्व दर व करासहित देणेची आहे. मक्तेदाराच्या होणा-या देवकातून शासनाचे सुचनेनुसार जी.एस.टी, आयकर कामगार विमा इ. सर्व शासकीय कर, उपकर कपात करणेत येतील.
6. मक्तेदाराने कामाकरीता मनुष्यबळास नगरपरिषदेच्या आस्थापनेवर कोणत्याही स्वरुपाचा हक्क प्राप्त होणार नाही, तसेच काम करताना दुखापत, अपघात झालेस त्याची सर्वस्वी जबाबदारी मक्तेदाराची राहील याकामी कोणत्याही स्वरुपाची नुकसान भरपाई मिळणार नाही.
7. मंजूर निविदा धारकाने विहित नमुन्यात योग्य रक्कमेच्या मुद्रांक शुल्कावर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील. मक्तेदाराने विहीत वेळेत करारनामा करुन न दिल्यास सदरचे मक्तेदाराची बयाणा रक्कम जप्त करुन मक्तेदारास काळया यादीत टाकणेत येईल.
8. निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना, शुध्दीपत्रक अथवा इतर माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
9. निविदेतील सर्व वा कोणत्याही अटी वा शर्ती पुर्ण न करणा-या मक्तेदाराच्या निविदा वा अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजल्या जातील.
10. कोणत्याही अटीवर (Conditional) आधारीत निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.
11. निविदेसोबत शुध्दीपत्रक काढणेची गरज भासल्यास ते http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
12. ई-निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क मुख्याधिकारी पलूस नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.
13. संक्षिप्त निविदा सुचना व सविस्तर सुचना निविदा संचाचा एक भाग राहील.

14. मक्तेदाराने स्वखर्चाने कामाच्या ठिकाणी इकडील सूचनेनुसार कामाचा तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक आहे.
15. मक्तेदाराने कामाकरीता लावलेल्या कामगाराचे भविष्य निर्वाह निधी खाते असणे आवश्यक राहील.
16. मक्तेदाराचे जी.एस.टी. नोंदणी आवश्यक राहील.
17. कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास त्याबाबत मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.
18. मुख्याधिकारी यांना कोणतीही कारणे नमूद न करता प्राप्त झालेल्या कोणत्याही किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा हक्क असेल.

**SD/-XXX**
**मुख्याधिकारी**
**पलूस नगरपरीषद, पलूस**

# निविदा प्रपत्र (टेंडर फॉर्म)

पलूस नगरपरिषद पलूस

प्रति, मा. मुख्याधिकारीसो,
पलूस नगरपरिषद, पलूस यांचे कडे सादर.

- निविदा धारकाचे नांव ____________________
- पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता : ____________________
- फोन नं. ____________________
- ई मेल आय डी ____________________
- कामाचे नांव ____________________
- मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ____________________
- बयाणा रक्कम रुपये ____________________
- डिपॉझीट रक्कम रुपये ____________________
- कामास मुदत ____________________

वर नमुद केलेले काम मी आम्ही नगरपरिषदेच्या टेंडर नोटीसी प्रमाणे असलेल्या मुदतीत पूर्ण करुन देणेस तयार आहोत.हे टेंडर मंजूर झालेनंतर सोबतच्या अटी व शर्ती व त्या पूर्ण करण्याचे मी आम्ही मान्य करतो त्यात कसूर झालेस करारातील अटीमध्ये नमूद केलेल्या रक्कमावरील हक्क सोडून देण्यास व ती नगरपालिकेस देण्यास माझी आमची संमती आहे. बयाणा भरले बाबतची स्कॅन पावती टेंडरसोबत जोडली आहे.

दिनांक :-

**मक्तेदाराची सही**

## अटी व शर्ती

1. काम योग्य तत्परतेने चालविले पाहिजे व केलेले सर्व काम योग्य रितीने असले पाहिजे. वापरावयाचे साहित्य टेंडर देणा-या इसमाचे। इसमानी पुरवावयाचे असल्यास ते स्पेशिफिकेशन प्रमाणे असले पाहिजे. सदर स्पेशिफिकेशन करणेचा अधिकार म्यु, पल इंजिनियर यांना राहील. मक्तेदाराचे सर्व काम स्पेशिफिकेशनप्रमाणे व सार्वजनिक बांधकाम / मजिप्रा विभागाचे मॅन्युअल प्रमाणे झाले पाहिजे.
2. जस जसे काम होईल तस तसे रनिंग बिल आदा केले जाईल.
3. काम समाधान कारक रितीने पूर्ण झाल्यानंतर मक्तेदाराने दाखला मागणी केलेस देणेत येईल. मक्तेदाराने ज्या जागेत काम केले असेल त्या जागेतील सर्व पायाडे (स्कॅफोल्डींग्ज), शिल्लक राहिलेले साहित्य, केरकचरा काढून नेले जाई तोपर्यंत व ज्या इमारतीवर काम झाले असेल किंवा काम करण्यासाठी जी इमारत त्यांच्या ताब्यात असेल अशा कोणत्याही इमारतीचे सर्व लाकडी काम, दारे, खिडक्या, भिंती, जमिनी किंवा इतर भाग साफ केला जाई तोपर्यत तसेच सदरहू कामाचे मोजमाप घेतले जाईतोपर्यत अशा प्रकारचा कोणताही दाखला देण्यात येणार नाही किंवा सदरहू काम पूर्ण झाले असे समजण्यात येणार नाही.
4. काम अयोग्य झाले असल्यास अगर स्पेशिफिकेशन प्रमाणे साहित्य वापरले गेले नसल्यास ते काढावयास लावून त्याचे जागी दुसरे साहित्य वापरणेस लावणेचा नगरपालिकेस अधिकार नापसंत केलेल्या कामाची किंमत अगर काढून टाकलेल्या साहित्याची किंमत अगर पुन्हा नवे साहित्य घातल्याबद्दलचा चार्ज हे टेंडर इसमास जी कोणती रक्कम त्यावेळी पुढे मिळणार असेल त्यातून कपात करणेचा अधिकार नगरपालिकेस आहे. त्याने त्यांनी स्वखर्चाने हे काम केल्यास प्रश्न उदभवणार नाही.
5. मक्तेदाराच्या कोणाही मजूरास काम चालू असता काही दुखापत वगैरे झाल्यास अगर अपघाताने मृत्यू आल्यास त्यासंबंधाने त्यास अगर त्याने वारसास द्यावयाच्या कोणत्याही नुकसानीची भरपाईची जबाबदारी मक्तेदारावर आहे. नगरपालिकेचा त्याच्याशी कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही. यासाठी आवश्यक त्या रक्कमेचा विमा उतरविणेची जबाबदारी मक्तेदारावर राहील.
6. मक्तेदाराने क्लेमचे कारण घडल्यापासून (म्हणजे मोजमापे घेतल्याच्या वर्गवारी केल्याच्या किंवा डिझाईनमध्ये वगैरे फरक करण्याबद्दल केलेल्या हुकुमाच्या एक महिन्याचे आत लेखी मागणी सादर केलेली असल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत मक्तेदारास नगरपालिकेकडून कोणत्याही कारणासाठी काहीही नुकसानभरपाई (कॉप्मेनसेशन) मागण्याचा हक्क राहणार नाही.
7. जेव्हा कामाच्या कोणत्याही बाबी मंजूर केलेल्या तपशीलावर हुकुम पूर्ण केला असल्याने मान्य करता येईल तेव्हांच त्या त्या बाबी संबंधी टेंडर मध्ये ठरलेले दर लागू होईल.
8. मक्तेदाराने 18 वर्षापेक्षा कमी वयाच्या कोणत्याही इसमास कामावर लावता कामा नये.
9. शर्तीस अनुसरुन नसलेले कोणतेही माणूस काम करीत असल्याचे आढळून आल्यास त्यास कामावरुन काढून टाकण्यामुळे सदरहू काम पुरे होणेस विलंब लागला तर त्याबद्दल नगरपालिका जबाबदार राहणार नाही.
10. कोणतेही टेंडर कमीचे अगर जास्तीचे मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार नगरपालिकेने राखून ठेवला आहे.
11. मक्तेदाराने फायनल बिलातून महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील तरतूदीप्रमाणे 10 टक्के सुरक्षा ठेव सर्व प्रकारच्या कामातून कापून घेऊन ते मक्तेदाराचे नांवे जमा करणेत येईल व काम पुरे होऊन दोषदायित्व कालावधी संपुष्टात आलेनंतर काम चांगल्या स्थितीत आहे अगर ते कसे पाहून सदरची रक्कम परत करणेत येईल. दरम्यान कामात कमी जास्त दिसून आलेस मक्तेदाराने आपले खर्चाने दुरुस्ती करुन देणे आहे. त्याने तसे न केलेस सदर रक्कमेतून दुरुस्ती करुन घेऊन बाकीची रक्कम दिली जाईल. रक्कमेस व्याज मिळणार नाही. जादा खर्च आल्यास मक्तेदाराकडून वसुल केला जाईल.
12. टेंडरमध्ये काम पुरे करण्यास दिलेली मुदत मक्तेदाराने तंतोतंत पाळली पाहिजे. या मुदतीचा प्रारंभ करार तारखेपासून धरला जाईल. टेंडर मंजूरीची समज दिल्यापासून 10 मक्तेदाराने करार करुन दिला पाहिजे. या मुदतीत पुर्तता न झालेस फेर टेंडर काढले जाईल. व होणा-या नुकसानीस टेंडर मंजूर झालेला मक्तेदार जबाबदार राहील. नेमून दिलेल्या मुदतीत मक्तेदाराने काम योग्य रीतीने व दक्षतेने केले पाहिजे. (कारण मुदत

है कंत्राटातील मुख्य तत्व आहे असे मक्तेदाराने मानले पाहिजे) कामाची प्रगती मुदतीच्या प्रमाणात योग्य ती ठेवली पाहिजे.

13. मक्तेदारास कामाची मुदत संपण्यापूर्वी योग्य ती कारणे नमूद करुन मुदतवाढीची मागणी करता येईल परंतु सदरची मागणी मंजूर करणेचे अधिकार नगरपरिषदेस राहील. अन्यतः खालीलप्रमाणे दररोज दंड आकारणेत येईल.

50 हजार पर्यत दररोज 100 रुपये
50 हजार ते 1 लाख दररोज 200 रुपये
1 लाख ते 5 लाख दररोज 500 रुपये
5 लाखाचे वरील सर्व कामे दररोज 1000 रुपये

यात्रमाणे दंडाची आकारणी केली जाईल. मुदतीत काम पूर्ण करणेची जबाबदारी मक्तेदार व जामीनदार यांची आहे. मुदत संपलेनंतर नगरपालिका केव्हांही मक्तेदार, जामिनदार यांना 1 (एक) महिन्याची नोटीस देऊन राहिलेले काम पूर्ण करणेस फर्मावेल वे त्या मुदतीत काम पूर्ण न झालेस योग्य त्या प्रकारचे काम नगरपालिका पूर्ण करुन घेईल त्यामध्ये येणा-या सर्व प्रकारच्या नुकसानीस मक्तेदार, जामीनदार जबाबदार राहील.

14. करारातील शर्तीनुसार मक्तेदार जर नुकसान भरपाई देण्यास जबाबदार असेल अथवा भयंकर आजारामुळे किंवा मृत्यूमुळे अथवा कोणत्याही अन्य कारणामुळे जर काम करणेस असमर्थ असेल तर नगरपालिकेचे हितार्थ योग्य वाटेल खालील पैकी कोणतेही एक अगर सर्व स्विकारणेचा नगरपालिकेस अधिकार आहे.
   अ) कंत्राट रद्द करणे यामुळे मक्तेदाराची सर्व प्रकारची रक्कम जप्त होईल.
   ब) एखादे काम अगर कामाचा भाग नगरपालिकेमार्फत करावा लागल्यास येणारा सर्व खर्च मक्तेदाराचे नांवे खर्ची घातला जाईल व ती रक्कम मध्ये नमूद केल्या पध्दतीनुसार वसुल केली जाईल.
   क) राहिलेले काम टेंडर मागवून अन्य मक्तेदाराकडून करवून घेतलेस येणा-या नुकसानीस मक्तेदार जबाबदार राहील. त्याच्याकडून ती रक्कम न.पा. कायदयातील घरफाळा वसुली पध्दतीचा अवलंब करुन वसुल केली जाईल.

15. कामाच्या पुर्ततेसाठी मक्तेदारना लागणारा माल, यंत्रसामुग्री, हत्यारे शिड्या पायाडाचे साहित्य इतर साधने अथवा हंगामी कामाला लागणा-या आवश्यक वस्तू स्वतःचे खर्चाने आणावयाच्या आहेत. (फक्त विशिष्ट साहित्य कराराप्रमाणे नगरपालिकेच्या स्टोअरमधून देणेचे ठरले असेल तर ते मात्र अशा वर्गात समाविष्ठ करावयाचे नाही) मोजमाप अगर वजन देण्यासाठी किंवा मापे घेण्यासाठी किंवा मापे घेण्यात अथवा मालाच्या अगर कामाच्या कोणत्याही वेळी किंवा वेळोवेळी होणा-या तपासणीमध्ये मदत करणेसाठी लागणारी जरुर ती माणसे व इतर साधन सामुग्रीही मक्तेदाराने पुरवावयाची आहे. त्याबद्दल त्याला मोबदला मिळणार नाही. जर त्यांच्याकडून याप्रमाणे तजविज झाली नाही तर नगरपालिका मक्तेदाराच्या खर्चाने व्यवस्था करील. कराराप्रमाणे मक्तेदाराला दयावयाचे रक्कमेतून अथवा अनामत रक्कमेतून असा खर्च वजा केला जाईल. हीजबाबदारी नगरपालिकेने ठरवावयाची आहे. मक्तेदाराने जरूर त्या ठिकाणी कुंपण घालून व दिवा ठेवून लोकांचे धोक्यापासून रक्षण केले पाहिजे या प्रमाणे दक्षता ठेवण्यासाठी दुर्लक्ष केल्याने कोणत्याही व्यक्तीस दुखापत झाली व व्यक्तीने फिर्याद, खटला अगर दुसरा काही कायदेशीर इलाज केला तर अशा प्रत्येक फिर्यादित खटल्यात आपल्या बचावासाठी होणारा खर्च सोसण्यास मक्तेदार बांधील राहील. याकामी दयावी लागणारी नुकसान भरपाई व फिर्यादीचा खर्च मक्तेदारानेच देणेचा आहे. अथवा आपसात तडजोड झाल्यास त्याचा खर्चही मक्तेदारानेच देणेचा आहे.

16. नगरपालिकेच्या पुर्व मंजूरीशिवाय मक्तेदाराला काम दुस-याच्या नांवाने करता येणार नाही किंवा पोटमक्त्यानेही देता येणार नाही जर त्याने काम दुस-याचे नांवे करुन दिले किंवा देण्याचा प्रयत्न केला किंवा दिवाळखोर ठरवून घेण्यासाठी कोर्टात काम चालविले अथवा आपल्या सावकाराबरोबर त्यांच्या देण्याच्याबाबतीत तडजोड (आणेवारी तत्वावर केली अथवा तसा करण्याचा त्याने प्रयत्न केला किंवा देणगी देण्याचा अगर कसलाही सांपत्तीक अगर अन्य त-हेचा फायदा करुन देण्याचा मक्तेदाराने त्याच्या कोणत्याही नोकराने अगर त्याचे तर्फेच्या कोणत्याही अन्य इसमाने प्रयत्न केला, वचन दिले अथवा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष कृती केली त्याचप्रमाणे असा अधिकारी अशी व्यक्ती त्यांचे प्रत्यक्ष कामाचा हितसंबंध निगडीत झाला तर मक्ता रद्द करण्यास पात्र राहील. मक्ता रद्द केलेनंतर मक्तेदाराने भरलेली रक्कम जप्त होईल.

17. टेंडर दिलेल्या कामाची मापे अंदाजे दिलेली असतात आणि टेंडर अथवा अंदाजपत्रक यात दाखविलेल्या कामाच्या पेक्षा केलेल्या कामाचे प्रमाण अधिक उणे झाल्यास त्याबद्दल विचारणा करण्याचा हक्क मक्तेदारास राहणार नाही.
18. कोणतेही काम (मुळ एस्टीमेंट मधील) कमी अगर जास्ती जेवढे करणेस लेखी हुकुम होईल तेवढे मक्तेदाराने करणेचे आहे. त्याबद्दल तक्रार चालणार नाही.
19. सदरहु कामगिरी नगरपालिकेचे प्राधिकृत अधिकारी यांचे देखरेखीखाली व त्यांचे पसंतीप्रमाणे कामाचे मटेरियल योग्य ते वापरुन काम चांगल्या प्रकारे पूर्ण करुन देईन नापसंत काम अगर माल मटेरियल दिसून आलेस ते मी काढून दुसरे चांगल्याप्रकारचे मटेरियल वापरुन काम पूर्ण करुन देईन. त्याबद्दल जादा आकार मागणार नाही व तक्रारही करणार नाही.
20. नगरपालिकेच्या सूचनेप्रमाणे जर एखादे काम अगर कामे मक्तेदाराने करणेस नाकारलेस त्याचे नांव ब्लॅकलिस्टमध्ये घालणेचा अधिकार नगरपालिकेस राहील.
21. अन्य जादा काम करावे लागल्यास त्याचा दर मंजूर शासकीय दर सुचीप्रमाणे देणेत येईल.
22. नगरपालिकेने दिलेल्या मालाची किंमत व मशिनरीचे भाडे बिलातून वसुल केले जाईल.
23. कामाची तपासणीस आपण अगर आपले प्रतिनिधी आल्यास त्यांना आवश्यक ते सहकार्य देईन व आपण अगर आपल्या प्रतिनिधीकडून मिळालेल्या सुचनांचे योग्य रीतीने पालन करीन.
24. मक्तेदारानी रॉयल्टी क्लिअररन्स सर्टिफिकेट आणून देणेचे आहे. तसेच वेळोवेळी शासकीय कर वाढल्यास अगर नविन बसविल्यास तो भरणेची जबाबदारी मक्तेदारावर राहील व शासकीय सर्क्युलर सदर कामास बंधनकारक राहतील.
25. कामातील निघालेले जुने मटेरियल न.पा. स्टोअरकडे जमा करणे बंधनकारक आहे.
26. झाले कामाचे देयक निधी उपलब्धतेनुसार अदा करणेत येईल.
27. वरील अटीतील कामाच्या अनुषंगाने असलेल्या सर्व अटी मक्तेदारावर बंधनकारक राहतील.

**मक्तेदाराची सही**

# **पलूस नगरपरिषद, पलूस**

परिशिष्ट- अ

प्रतिज्ञा पत्र

मी / आम्ही याव्दारे असे नमूद करतो की, महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (आय) व कलम ४४ (१) (ब) तरतुदीच्या, ज्या खाली उदधृत केलेल्या आहेत. माहिती आहे आणि गंभीरपणे नमूद करतो की, नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या करण्यात येणा-या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा आमच्याशी भागीदारी नाही.

**कलम १६ (१) (आय)** : यापुढे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त नगरपालिकेच्या आदेशावरुन केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वतःचा किंवा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल. **कलम ४४ (१) (ब):** पालिका सदस्य म्हणून किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून ज्या कोणत्याही बाबतीत कलम १६ चे पोट-कलम (३), खंड (अ), (ब), (क), (इ) व(ग) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्यांचा भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल, अशा हिश्श्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो किंवा जीत त्याच्या अशीलाच्या, प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यावसायिकदृष्ट्या त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

निविदा धारकाचे नांव :- ______________________________

पत्ता :- ______________________________

सही

दिनांक :-

साक्षीदाराचे नांव :- ______________________________

पत्ता :- ______________________________

साक्षीदाराची सही

Signature Not Verified

Digitally signed by Pratik Arvind Nikam
Date: 2026.05.18 15:27:06 IST
Location: Maharashtra-MH